## “ सर्वांना बरोबर घेऊन शहराच्या विकासासाठी प्रामाणिक प्रयत्न करणार ” – संदीप जोशी

महाराष्ट्रात सध्या ओल्या दुष्काळाचा सामना शेतकरी बंधुंना करावा लागत आहे. मनपाचा शेतक-यांशी सरळ संबंध नसला तरी शेतक-यांच्या भावनांशी संबंधित संवेदनशीलता म्हणुन कोणत्याही प्रकारचा सत्कार, पुष्पगुच्छ, शाल, श्रीफळ, न स्वीकारता सरळ कामाला लागण्याचा निर्णय आम्ही घेतलेला आहे. हे करत असतांनाच या शहरामध्ये अनेक युवा खेळाडु आपल्या क्रीडा प्रकारात अनेकदा पैशाअभावी शहराच्या बाहेर क्रीडास्पर्धांकरीता जाऊ शकत नाही तसेच झोपडपट्टीमध्ये राहणारे अत्यंत गरीब असलेले व्यक्ती जे दुर्धर रोगानी त्रस्त आहे, ज्यांची मुख्यमंत्री सहाय्यता निधी अथवा इतर कोणत्याही निधीमध्ये त्यांची गणना होत नाही अशा सर्वांच्या सहाय्यतेकरीता **“ महापौर सहाय्यता निधी ”** उभारण्यात येईल, या सहाय्यता निधीमध्ये कोणाला सहाय्य करण्यात येईल याची धोरणे निश्चित करण्याकरीता नगरसेवक श्री.संजय बंगाले यांच्या अध्यक्षतेखाली ॲड श्री.संजय बालपांडे, श्री.संदीप सहारे, श्री.मो.जमाल यांची समिती बनवुन ३१ डिसेंबर पर्यत धोरणे निश्चित करुन १ जानेवारी २०२० पासुन महापौर सहाय्यता निधीच्या वाटपाला प्रारंभ करण्यात येईल. त्यामुळे पुष्पगुच्छ, शाल, श्रीफळ व सत्कारामध्ये खर्च होणारी रक्कम ही “ महापौर सहाय्यता निधी ” या नावाने धनादेश म्हणुन देण्यात यावी असे आव्हान आमचे सर्व कार्यकर्ते व नागपूर शहरातील नागरिकांना, विवीध संस्थांच्या प्रतिनिधींना मी आपल्या मार्फेत करतो.

ही महानगरपालिका विविध समाज, विविध धर्मियांची, विविध विचारांच्या नागरिकांची असुन हे शहर सुंदर व्हावे, उत्तम व्हावे यावर सर्वांचेच एकमत आहे. अनेकांकडे या बद्दल अनेक योजना आहेत, या योजनांचा या सुचनांचा फायदा शहर विकासाकरिता होण्याच्या दृष्टीने शनिवार दिनांक २३/११/२०१९ ते दिनांक १/१२/२०१९ या ८ दिवसामध्ये शहरातील विविध घटकाकडे जावून त्या घटकाकडुन शहराच्या सौदर्यीकरणाकरीता, शहर हिरवेगार व स्वच्छ राहण्याकरीता, शहराच्या विकासाकरीता ज्या काही सूचना असतील त्या सूचना घेऊन त्यांचे एकत्रीकरण करुन शहराच्या समग्र विकासाकरीता आराखडा तयार करण्याचा आमचा मानस आहे. या अंतर्गत खालील २ उपक्रम येणा-या आठवडयात करण्याचे निश्चित केलेले आहे.

## “ Walk & Talk With Mayor ”

नागपूर शहरामध्ये विविध उद्याने असुन या उद्यानामध्ये विविध घटकातील प्रतिष्ठीत मंडळी, सामाजिक कार्यकर्ते, उद्योजक व शहराच्या विकासाला दिशा देणारे अनेक जण सकाळी फिरायला जात असतात यांच्या सूचना घेण्याकरीता शहरातील खालील ७ ठिकाणी रोज सकाळी ७.३० वाजता जाण्याचे निश्चित केले असून त्या ठिकाणी त्यांच्या सूचना ऐकण्यात येतील.

| अनु क्र | दिनांक | ठिकाण |
|---|---|---|
| १. | रविवार, दि.२४/११/२०१९ | मेजर सुरेंद्रदेव पार्क धंतोली उद्यान, नागपूर |
| २. | सोमवार, दि.२५/११/२०१९ | जपानीज गार्डन, सेमिनरी हिल, नागपूर. |

| | | |
|---|---|---|
| ३. | मंगळवार, दि.२६/११/२०१९ | चाचा नेहरु बालभवन उद्यान, सुभाष रोड, नागपूर |
| ४. | बुधवार, दि. २७/११/२०१९ | दयानंद पार्क, जरीपटका नागपूर. |
| ५. | गुरुवार, दि.२८/११/२०१९ | अंबाझरी उद्यान, नागपूर. |
| ६. | शुक्रवार, दि.२९/११/२०१९ | **भारत माता व डॉ. बाबासाहेब आंबेडकर, गरोबा मैदान, नागपूर** |
| ७. | शनिवार, दि.३०/११/२०१९ | दत्तात्रय नगर, सक्करदरा नागपूर |

## "बस एवढं करा" महापौरांना सुचना

शहरातील विविध प्रकारची उद्याने, महानगरपालिकेचे क्षेत्रीय कार्यालय, प्रमुख चौक अशा १०० ठिकाणी दिनांक २९,३० व १ रोजी सजेशन बॉक्स लावुन नागरिकांनी त्या ठिकाणी आपल्या तक्रारी नव्हेत तर सूचना टाकाव्यात हे देखील आव्हान या ठिकाणी आपल्या मार्फेत करतो. या शिवाय येणा-या सप्ताहात विविध विभागांच्या बैठकी, झोननिहाय नगरसेवकांच्या बैठकी, विविध स्वयंसेवी संस्था सोबत बैठकी देखील **पूर्ण** करुन त्यांचे देखील सूचना विचारात घेण्याचा आमचा मानस आहे.

## "नागरीकांच्या तक्रारींची सुनावणी"

हे होत असतांनाच शहरात सध्या कचरा संकलनापायी उदभवलेली परिस्थिती, रस्त्यावरील कुत्र्यांमुळे उदभवलेली स्थिती, फुटपाथ वरील अतिक्रमणांची स्थिती, गायीचे गोठे शहराबाहेर न हलविल्यामुळे निर्माण झालेली स्थिती, स्वच्छ सर्वेक्षणापुढे उभे असलेले आव्हान, सिमेंट रस्त्यांचे अपुर्ण राहिलेले कामे, म.न.पा. कर्मचाऱ्यांचा ७ वा वेतन आयोग याकडे देखील दुर्लक्ष करुन चालणार नाही. त्यामुळे या विविध समस्या व इतरही समस्याबाबत नागरिकांच्या तक्रारी असल्यास दिनांक २६ नोव्हेंबर ते दि. ५ डिसेंबर पर्यत १० ही झोनमध्ये अशा तक्रारींचे ३ प्रती मध्ये स्वीकारल्या जातील, तसेच या सर्व तक्रारींच्या निराकरणासाठी बुधवार दिनांक ११ डिसेंबर रोजी मनपा सिव्हील कार्यालयात तक्रार निवारण शिबीर घेण्यात येईल.

## "कचरा समस्येबाबत आजच बैठक"

कचरा संकलनावरुन उद्भवलेल्या समस्येला अत्यंत गंभीरपणे घेणार असून आज सायंकाळी ०५-३० वाजता सर्व प्रभागाचे स्वास्थ निरीक्षक, झोनल स्वास्थ अधिकारी, नवीन दोन्ही संस्थांचे प्रतिनिधी मनपा आयुक्त यांचेसोबत कार्यालयात बैठक घेणार आहे.

हे शहर आपल्या सर्वांचे असुन या शहराकरीता शहरातील विरोधी पक्ष, शहरातील सर्व मा.आमदार, शहरातील सर्व राजकीय पक्षाचे नेते, शहरातील सर्व सामाजिक नेते या सर्वांना सोबत घेऊन त्यांच्याशी चर्चा करुनच आम्ही मार्गक्रमण करु. तसेच शहराच्या विकासात लोकसहभागाची देखील मोठया प्रमाणात आवश्यकता असल्याने नागरीकांनी देखील तो द्यावा असे आव्हान मी करतो.

टिप :- हा माझा व्हॉटस् ॲप नंबर ९७६४०००७८४ आहे. जनतेच्या काही समस्या असतील तर त्यांनी या क्रमांकावर आपल्या समस्या पाठवाव्या.